महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक
प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा)- सत्र-108
अंतीम परिक्षा

पेपर क्र. VI — शुक्रवार - 23/08/2013
विषय - तपास (थेअरी) — वेळ - 15.00 ते 18.00
**Investigation (Theory)** — गुण - 100

**********************************************************************

सुचना- अ. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. -- All questions are compulsory.
ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहेत. -- Marks for each question are indicated there-against.
क. वाचनीय अक्षरात लिहावे. शब्द-मर्यादा पाळावी. -- Write legibly. Abide by word limit.
ड. फक्त निळ्या/काळ्या बॉलपेनचाच वापर करावा. -- Use blue/black ball point pen only.

**********************************************************************

गुण / Marks

**प्र.1 खालील बहुउत्तरीय प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत नोंदवा. (प्रत्येकी 1 गुण)** **(10)**

प्र 1 (1) पोलीस ठाणे अंमलदाराने जर फिर्याद लिहुन घेण्यास नकार दिला तर भादंवि चे कोणते कलमाप्रमाणे गुन्हा होतो?

(अ) कलम 166 भा.दं.वि — (ब) कलम 168 भा.दं.वि
(क) कलम 180 भा.दं.वि — (ड) कलम 182 भा.दं.वि

प्र 1 (2) मा.सर्वोच्च न्यायालयाने "अटक बाबत" मार्गदर्शक तत्वे कोणत्या प्रकरणात दिली आहेत?

(अ) पी.के.बसु वि. पंजाब राज्य — (ब) डी.के. बसु वि. पश्चिम बंगाल
(क) डी.के.वसु वि. मध्य प्रदेश राज्य — (ड) आर.के.बसु वि.उडीसा राज्य

प्र 1 (3) मृत्यु पूर्व जबाब भारतीय पुरावा कायदयाचे कोणते कलम अन्वये ग्राहय धरला जातो?

(अ) कलम 34 — (ब) कलम 38
(क) कलम 36 — (ड) कलम 32

प्र 1 (4) इन्क्वेस्ट पंचनामा क्रि.प्रो.कोडच्या कोणत्या कलमानुसार केला जातो?

(अ) कलम 174 — (ब) कलम 175
(क) कलम 176 — (ड) कलम 178

प्र 1 (5) क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या कोणत्या कलमा प्रमाणे मा.उच्च न्यायालय व सत्र न्यायालयास अटकपुर्व जामीन मंजूर करता येतो?

(अ) कलम 436 — (ब) कलम 438
(क) कलम 432 — (ड) कलम 428

प्र 1 (6) ज्यावेळेस दोन वस्तु एकमेकांच्या सानिध्यात येतात, त्या वेळी त्यांच्यातील घटकांचा रंग, व वास इ. गुणधर्माची देवाण घेवाण होते. सदर सिध्दांत कोणी मांडला?

(अ) लोकार्ड — (ब) ली कूपर
(क) पाश्चर — (ड) लारेन्स

प्र 1 (7) खालील पैकी कोणती स्केच काढण्याची पध्दती नाही?

(अ) क्रास प्रोजेक्शन पध्दत. — (ब) त्रिकोण पध्दत.
(क) गोलाकार पध्दत. — (ड) काटकोन समन्वय पध्दत.

प्र 1 (8) तपासाचा दैनंदिन अहवाल गुन्ह्याचा तपास करणाऱ्या प्रत्येक पोलिस अधिकाऱ्याने केस डायरी मध्ये क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या कोणत्या कलमा वये ठेवला पाहिजे?

(अ) कलम 171 (1) (ब) कलम 173 (2)

(क) कलम 171 (2) (ड) कलम 172 (1)

प्र 1 (9) "खास अहवाल" पाठविणेचा उद्देश काय आहे?

(अ) तपास करणे. (ब) तपासावर योग्य नियंत्रण ठेवणे.

(क) वरिष्ठांना माहिती देणे. (ड) जनजागृती करणे.

प्र 1 (10) ज्यांनी गुन्हा केला आहे किंवा केल्याचा संशय आहे अशा इसमांची विचारपुस म्हणजे

(अ) मुलाखत. (ब) तर्क.

(क) चौकशी. (ड) संभाषण.

प्र.2 पोलीसी गुन्हा-तपासाची महत्वाचे वैशिष्टये नमूद करा. **(150 शब्द)** (10)

प्र.3 पहिल्या खबरी मध्ये नमूद करावयाच्या आवश्यक बाबी विषद करा. **(150 शब्द)** (10)

प्र.4 मोकळे मैदानातील घटनास्थळाचे तपासासाठीचे निरीक्षण कोण-कोणत्या प्रकारे केले जावू शकते? आकृत्यांसह स्पष्ट करा. **(150 शब्द)** (10)

प्र.5 मृत्युपूर्व जबाब घेण्याची पध्दत नमुद करा. **(150 शब्द)** (10)

प्र.6 CCTNS प्रणाली काय आहे? 7 इंटीग्रेटेड फार्मस कोणते आहेत? विवेचन करा. **(150 शब्द)** (10)

प्र.7 झडती मेमो (पंचनामा) तयार करताना कोणते मुद्दे नमूद केले पाहिजेत? स्पष्ट करा. **(150 शब्द)** (10)

प्र.8 अटक करण्याची आवश्यकता कोणत्या कारणावरुन ठरविले जाते? अटक करताना कोणती खबरदारी घेणे आवश्यक आहे? स्पष्ट करा. **(150 शब्द)** (10)

प्र.9 कुणीतरी अज्ञात व्यक्तीने दि.16/08/2013 रोजी URL- www.facebook.com/anita.patil.756 या नावाने फेसबुक अकाऊंट ओपन केले. त्यात कुमारी अमिताचे फोटो प्रदर्शित करुन त्याखाली अश्लिल व शिवराळ मजकुर लिहीला व तिस लज्जा वाटेल व तिची बदनामी होईल असे कृत्य केले. तपासी अधिकारी म्हणून अशी फिर्याद प्राप्त झाल्यानंतर (10)

**(9A)** आपण कोणत्या कायदयाच्या कोणत्या कलमाखाली गुन्हा नोंदवाल? (5 गुण 75 शब्द)

**(9B)** तपासामध्ये आरोपी शोधणेसाठी व अकाउंट बंद करणेसाठी काय कार्यवाही कराल? स्पष्ट करा. (5 गुण 75 शब्द)

प्र.10 आपण पोलीस स्टेशनला आपलेकडिल तपासावरील गुन्हे निर्गती बाबत केस डायरी लिहित असताना आपले ठाणे अंमलदार HC सोळंकी यांनी येवुन माहिती दिली कि, आपल्या हद्दीतील सांगवी गावात एक युवक नामे बजरंग सोनवणे, वय 25 वर्ष - यांनी आपले स्वतःचे घरात गळफास घेवुन आत्महत्या केली आहे. ही माहिती पोलीस स्टेशनचे फोन वरुन सांगवी गावाचे पोलीस पाटील महेंन्द्र अंगद मोहिते यांनी दिली. घडलेल्या प्रकाराची नवकी वेळ सांगता येत नाही असे पोलीस पाटील यांनी सांगितले. (10)

(10अ) या प्रकरणामध्ये तपासासाठी आपण काय कार्यवाही कराल. (5 गुण 75 शब्द)

(10ब) गळफासाने मृत्युच्या तपासामध्ये कोणती प्रक्रिया अवलंबिली जाते? (5 गुण 75 शब्द)

******************************************************************************